दै. देशोन्नती दि. 12/01/25

# चोरीच्या सात मोटारसायकलींसह चोरटा तामसा पोलिसांच्या ताब्यात



देशोन्नती वृत्तसंकलन

**तामसा :** पोलीसांनी मोटारसायकल चोरीतील फरार आरोपीला अटक करून त्याचेकडील घरात ठेवलेल्या सात मोटारसायकली ताब्यात घेतल्याची घटना ८ रोजी घडली. हदगाव न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती.

२३ डिसेंबर २०२३ रोजी तामसा येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक पांडूरंग भुरके यांची घरासमोर उभी केलेली मोटारसायकल क्रमांक एम.एच.-२६, एजे - २५४६ ही अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याच्या तक्रारीवरुन २८ डिसेंबर २०२४ रोजी कलम ३७९, ३४ भादवीनुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध मोटारसायकल चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. १९ डिसेंबर २०२३ रोजी भोकर पोलीसांनी मोटारसायकल चोरीतील आरोपी विजय तुळशीराम सोनकांबळे (वय ३४ वर्ष) रा. दिवशी ता. भोकर याला मोटारसायकल चोरताना पकडले होते. त्यातून तामसात येथील मोटारसायकल चोरीचे प्रकरण उघडकीस आले होते. आरोपीने तामसा येथील मोटारसायकल चोरीत आरोपी नवीन नारायण गुदेवार (वय ३२ वर्ष) रा. दिवशी ता. भोकर असून तो फरार असल्याची कबुली दिली होती. त्यातूनच तामसा येथील मोटारसायकल चोरीच्या तपासाचा धागा सापडला. भोकर उपविभागीय पोलीस अधिकारी शफाकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली तामसा पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवले. फौजदार बालाजी नरवटे, पोहेकॉ.

डीएसबीप्रमुख प्रकाश कबले, किरण डोरले यांनी फरार आरोपी नवीन गुदेवार याला दिवशी येथे अटक करून घरात ठेवलेल्या सात मोटारसायकली जप्त केल्या. ज्यांची अंदाजे किंमत ३ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे हा आरोपी हिरो कंपनीच्याच दुचाकी चोरी करीत असल्याचे सांगण्यात आले. (वार्ताहर)